# जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

ई-मेल : **chandrapur.rdc@gmail.com**
फोन क्रमांक – 07172-250659

क्रं.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/ 347
दिनांक :- 19 एप्रिल, 2020

**संदर्भ** :- 1. या कार्यालयाचे आदेश क्रं. एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/283 दिनांक 30.03.2020.
2. महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्रं.DMU/2020/CR.92/DISM-1 दिनांक 17.04.2020.

**-: आदेश :-**

ज्याअर्थी महाराष्ट्र राज्यांतर्गत कोरोना विषाणुचा (कोव्हिड-19) प्रादुर्भाव झपाटयाने वाढत असुन महाराष्ट्र शासन, आरोग्य विभागाव्दारे कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता साथरोग प्रतिबंध कायदा, 1897 लागु करुन त्यातील तरतुदींची अंमलबजावणी दि. 13.02.2020 पासुन लागु करुन खंड 2,3 व 4 मधील तरतुदींनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे.

आणि ज्याअर्थी जिल्हयातील क्षेत्रीय स्तरावर कायदा व सुव्यवस्थाबाबत नियोजन व समन्वय, क्षेत्रीय स्तरावरील अडचणी सोडविण्याचे व क्षेत्रीय स्तरावर आदेश देणे, वाहतुकीचे अडचणी असल्यास क्षेत्रीय स्तरावर संबधीतांना आदेश देणे व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे त्याचबरोबर फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 अन्वये पारीत करण्यात आलेल्या प्रतिबंधात्मक आदेशाची योग्यरितीने अंमलबजावणी करण्याचे संबधाने उपविभागीय अधिकारी यांची **Incident Commander** म्हणुन संदर्भिय क्रं. 1 वरील आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी राज्य शासनाचे संदर्भिय क्रं. 2 वरील आदेशानुसार जिल्हयात दि. 20.04.2020 रोजीपासुन सुट दिलेल्या प्रवर्गात येणारे औद्योगिक आस्थापना, औद्योगिक वसाहती, बांधकाम आस्थापना (शासकीय व खाजगी) यांचे संबधातील अधिकारी/कर्मचारी यांना पासेस उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मी डॉ. कुणाल खेमनार, जिल्हाधिकारी, चंद्रपूर याव्दारे असे आदेशीत करतो की, उपविभाग अंतर्गत असलेले औद्योगिक आस्थापना, औद्योगिक वसाहती, बांधकाम आस्थापना (शासकीय व खाजगी) यांचे संबधातील अधिकारी/कर्मचारी यांनी पासेस सुविधेची मागणी केल्यास त्यांना ई-पास परवानगी देण्यात यावी. याकरिता संबधीतांनी ई-पास करीता E-Pass Chandrapur, Google play store मधुन डाऊनलोड करुन अर्ज करावेत.

संबधीत उपविभागीय अधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्र अंतर्गत औद्योगिक आस्थापना, औद्योगिक वसाहती, बांधकाम आस्थापना (शासकीय व खाजगी) यांचे संबधातील अधिकारी/कर्मचारी यांना ई-पासेस निर्गमीत करण्याकरिता स्वतंत्र Login ID व Password उपलब्ध करुन देण्यात येईल त्यानुसार उपविभागीय अधिकारी यांनी सदर लॉगीन मध्ये येणा-या अर्जानुसार रितसर परवानगी द्यावी. संबधीत उपविभागीय अधिकारी यांनी ई-पास परवानगी देतांना संबधीत **उपविभागीय पोलीस अधिकारी** यांचेशी चर्चा करावी.

उपविभागीय अधिकारी यांनी परवानगी दिल्यानंतर QR Code जनरेट होईल व संबधीत पोलीस अधिकारी/कर्मचा-यांना गस्तीचे वेळी QR Code स्कॅन करुन QR Code ची खात्री करुन तपासणी करता येईल तसेच ई-पास ची परवानगी PDF मध्ये सुध्दा डाऊनलोड होत असल्याने त्यांची प्रिंट करुन पोलीस अधिका-यांना आवश्यकतेप्रमाणे दाखविता येईल.

**सदरचा आदेश आज दिनांक १९ एप्रिल, 2020 रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला आहे.**

जिल्हा दंडाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी कार्यालय ★ चंद्रपूर ★

स्वा/-
(डॉ. कुणाल खेमनार)
जिल्हादंडाधिकारी,
चंद्रपूर

**<u>प्रतिलीपी :- माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव.</u>**

1. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
3. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर
4. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
5. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
6. मुख्याधिकारी, नगर परिषद/ नगर पंचायत (सर्व)
7. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर

**सदर आदेशाची उपरोक्त अधिकारी यांनी प्रसिध्दी द्यावी.**

जिल्हादंडाधिकारी,
चंद्रपूर